महाराष्ट्र शासन

# इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर


**INDIRA GANDHI GOVT. MEDICAL COLLEGE & Hospital ,NAGPUR-18**

Phone No.0712-2725274 (P)2770929 Fax-(0712)2728028

P.B.X.. 0712-2728621 to 27 E-Mail igmcn@rediffmail.com 2774766(Hospital


क्र.इंगाशावैमवरुना/आस्था-२/जाहिरात वै.अ./ 10869-70 /२४ दिनांक 15/०७/२०२४

## जाहिरात

**विषय - वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ यांची रिक्त पदे कंत्राटी तत्वावर थेट मुलाखतीव्दारे २९ दिवसांकरीता भरण्याबाबत.**

**संदर्भ - शासन निर्णय क्र. वेतनी २०१९/प्र.क्र. ०३/२०१९/वैसेवा-२ दि. ३१/१२/२०२०.**

**इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेच्या रुग्णालयीन आस्थापनेवर वैद्यकीय अधिकारी गैरहजेर असल्याने रिक्त असलेली वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ ची पदे २९ दिवसांकरीता कंत्राटी तत्वावर स्थानिक निवड मंडळामार्फत रुग्णसेवा सुरळीत चालविण्याच्या दृष्टिने वैद्यकीय अधिकारी पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.**

**तरी इच्छुक उमेदवारांनी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील अर्ज संपूर्ण शैक्षणिक तपशिलासह/आवश्यक त्या कागदपत्रे/ प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतीसह अधिष्ठाता यांचे कार्यालय, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर, सी.ए.रोड नागपूर या पत्त्यावर सदरील जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून दिनांक २२/०७/२०२४ रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत स्वहस्ते सादर करावा.**

**तसेच दिनांक २३/०७/२०२४ रोजी मुळ प्रमाणपत्रासह सकाळी १२.०० वाजता अधिष्ठाता यांचे दालन, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे प्रत्यक्ष मुलाखतीकरीता (Walk-in-Interview) उपस्थित राहावे. मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास उमेदवाराचा कंत्राटी नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.**

**रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे**

| अ.क्र | पदाचे नाव | विषय | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | नियुक्ती आदेश |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ | अपघात विभाग | ०५ | एम.बी.बी.एस | २९ दिवसांकरीता |

रिक्त जागांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता असल्यामुळे सदरील रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याचे अधिकार प्रशासनास राहतील. तसेच या जाहिरातीमधील कोणताही मजकूर उदा. अटी, शर्ती, नियम, पदसंख्या इत्यादी मध्ये कोणतेही बदल करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहे. जाहिर केलेल्या रिक्त पदासाठी मुलाखती घेण्यात येत असून, रिक्त पदांच्या उपलब्धतेप्रमाणे प्रथम निवड झालेल्या पात्र उमेदवारांना नियुक्तीचे आदेश देण्यात येतील व तद्नंतर रिक्तपद उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे विचार करण्यात येईल. उमेदवाराची कागदपत्रे परिपुर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**नियम व अटीः-**

१) वेतनश्रेणीः- वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ यांना दि. ३१/१२/२०२० च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार दरमहा ठोक मानधन रु. ७५०००/- अनुज्ञेय राहील. सदरील वेतन संस्थेत मंजूर असलेल्या मुळ अनुदानातून १० कंत्राटी सेवा या उद्दिष्टामधून भागविण्यात येईल.

२) वयोमर्यादाः- सेवाप्रवेश नियमानुसार वयोमर्यादा खुल्या प्रवर्गाकरीता ३८ वर्ष व मागास प्रवर्गाकरीता ४३ वर्ष राहील. उमेदवार मागास प्रवर्गात असेल तर जात व जातवैधता प्रमाणपत्र आवश्यक राहील.

३) <u>अर्ज सादर करण्याबाबत :-</u>

१) विहित नमुन्यात संपुर्णपणे व योग्य त-हेने भरलेले अर्ज आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतिसह वर उल्लेख केलेल्या अंतिम दिनांकापुर्वी व वेळेपुर्वी या महाविद्यालयात प्रत्यक्ष सादर करणे तसेच अपुर्ण भरलेले प्रमाणपत्रांच्या सांक्षांकित छायाप्रती सोबत नसलेले अर्ज स्विकारले/विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

२) ज्या उमेदवारांनी या अगोदर म्हणजे जाहिरात प्रदर्शित होण्या अगोदर साध्या कागदावर अर्ज केले असतील त्यांनी विहित नमुन्यातील अर्ज अंतिम दिनांकापुर्वी या कार्यालयास आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतिसह सादर करावा. पुर्वीचे साध्या कागदावरील अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

४) <u>विहित नमुन्यातील अर्जाबरोबर सादर करावयाची कागदपत्रे :-</u>

उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज योग्य त-हेने व संपुर्ण भरल्यानंतर त्यासोबत पुढील कागदपत्राच्या/प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतिसह सादर करणे आवश्यक आहे.

१) प्रथम, व्दित्तीय, तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. उत्तीर्ण गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र

२) प्रयत्नाचे प्रमाणपत्र

३) इंटरशिप पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र

४) जन्म तारखेचे प्रमाणपत्र/ माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र

५) जातीचे प्रमाणपत्र व जाती वैधता प्रमाणपत्र ज्या संवर्गासाठी जॉन-क्रिमीनेयर प्रमाणपत्र आवश्यक आहे. त्या सवर्गातल्या उमेदवारांना ते सादर करणे आवश्यक आहे.

६) अनुभवाचे प्रमाणपत्र

७) बंधपत्रीय उमेदवार असल्याचे प्रमाणपत्र जोडुन बंधपत्रीय कालावधी कधी सुरु झाला पैकी किती कालावधी पुर्ण केला याबाबतीत योग्य ते पुराव्याचे कागदपत्रें जोडणे उमेदवारास बंधनकारक आहे. त्या शिवाय त्यास नियुक्ती देता येणार नाही

८) महाराष्ट्र मेडीकल कॉन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र

जे उमेदवार खाजगी वैद्यकिय महाविद्यालयातुन एम.बी.बी.एस. परिक्षा उत्तीर्ण झालेले असतील व बंधपत्रित उमेदवार म्हणुन दावा करीत असतील त्यांनी संबंधीत महाविद्यालयाकडुन ते शासकीय सेवा करण्यास बंधपत्रित असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

९) <u>निवड प्रक्रियाबाबत :-</u> स्थानिक निवड मंडळा मार्फत उमेदवारांची त्यांच्या गुणवत्तेनुसार उपलब्ध जागेनुसार तात्पुरत्या स्वरुपात २९ दिवसाकरीता कंत्राटी स्वरुपात निवड केली जाईल.

५) <u>नियम,अटी व शर्ती :-</u> उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. उमेदवार जर

१) एमबीबीएस अभ्यासक्रम या संस्थेतून पास केलेल्या बंधपत्रित उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. उमेदवार जर<br>
या संस्थेतून पास झाला नसल्यास महाराष्ट्रातील इतर शासकीय संस्थेतून पास झाला असल्यास त्यास प्राधान्य देण्यात<br>
येईल. महाराष्ट्रातील इतर शासकीय संस्थेतून पास झालेला उमेदवार उपलब्ध नसल्यास खाजगी संस्थेतून किंवा इतर<br>
राज्यातून आलेल्या विद्यार्थ्यांना विभागाची निकड लक्षात घेता प्राध्यान्य देण्यात येईल.<br>
२) निवड करण्यात आलेला उमेदवार कार्यरत असताना सतत जास्त कालावधी गैरहजर असल्यास किंवा काम<br>
समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती कोणतीही पुर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.<br>
३) सदर पदाकरीता उमेदवाराची नियुक्ती २९ दिवसांकरीता कंत्राटी स्वरुपाची राहिल. २९ दिवसानंतर रिक्त पद<br>
उपलब्ध असल्यास एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुन्हा २९ दिवसाकरीता विचार करण्यात येईल. सदरील नियुक्ती<br>
दरम्यान महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शासनाकडून नियमित अथवा बदलीने उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी<br>
तत्वावरील तात्पुरती नियुक्ती कोणतीही पुर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.<br>
४) मुलाखतीस उपस्थित राहण्याकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता व दैनिक भंत्ता अनुज्ञेय राहणार नाही, तसेच<br>
मुलाखतीस उपस्थित राहण्याकरीता या कार्यालयामार्फत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. जर उमेदवार<br>
इतर संस्थेत कार्यरत असल्यास त्या संस्थेचे नां हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

<u>सदर जाहिरात या महाविद्यालयाच्या iggmc.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे</u>.

अधिष्ठाता

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय<br>
व रुग्णालय, नागपूर.

प्रति,

१) वैद्यकीय अधिक्षक, इंगांशावैमवरु नागपूर

२) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये यांचे माहितीकरीता सविनय सादर.

३) नोटीसबोर्ड करीता, इंगांशावैमवरु नागपूर.

प्रतिलिपी माहितीकरीता सविनय सादर

मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

## इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर.

## वैद्यकीय अधिकारी या पदासाठी अर्ज

पासपोर्ट साईज फोटो

उमेदवाराचे नांव :-

वय :- लिंग :- स्त्री/पुरुष

जन्म तारीख :-

स्थायी पत्ता :-

सध्याचा पत्ता

दुरध्वनी क्रमांक

पदवी/पदव्युत्तर :- महाविद्यालयाचे नाव :-

बंधपत्रित/अबंधपत्रित :- एम.एम.सी.रजिस्ट्रेशन नं.

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | महाविद्यालयाचे नाव | एकूण गुण/पैकी | टक्केवारी | प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|
| १ | एमबीबीएस प्रथम वर्ष (I) | | | | |
| २ | एमबीबीएस द्वितीय वर्ष (II) | | | | |
| ३ | एकूण (III) एमबीबीएस (भाग १ +२) | | | | |
| ४ | पीजी पदविका/पदवी | | | | |

अनुभवाचा तक्ता :-

| अ.क्र. | पद व संस्थेचे नाव | दिनांक पासून | दिनांक पर्यंत |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

अर्जासोबत सादर करावयाचे प्रमाणपत्रे

१.एम.बी.बी.एस.गुणपत्रिका (प्रथम + व्दित्तीय + तृतिय वर्ष) २. विद्यापिठ पदवीची/पदविका
३. प्रयत्न प्रमाणपत्र ४. एम.सी.आय. नोंदणी प्रमाणपत्र
५. जातीचा दाखला ६. जातवैधता प्रमाणपत्र
७. नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ८. वयाचा दाखला. (Leaving Cert.) ९. इंटरशिप प्रमाणपत्र

उमेदवाराची स्वाक्षरी :- ..........................................................

दिनांक :- ...................... शेरा – पात्र /अपात्र –..........................................

..........................................................................................................